


वाकड ते मामुर्डी सर्व्हिस रस्त्याच्या कामाला गती, वाहतूक कोंडीतून होणार कायमची सुटका

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक 01/10/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 229 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाच महत्त्वाचे निर्णय!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांत मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. त्यामुळे राज्य सरकारने बाधित शेतकऱ्यांसाठी मदत सुरुवात केली आहे. दुसरीकडे राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीतही शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. नुकसानग्रस्त भागासाठी पुढच्या आठवड्यात घोषणा करू आणि दिवाळीच्या आधीच ही मदत पोहोचवू अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची मंगळवारी बैठक पार पडली. यावेळी शेतकऱ्यांना मदत पुरवण्यासह पाच महत्त्वाचे निर्णय देखील घेण्यात आले. नागरिकांना कर्करोग रोगासंदर्भात दर्जेदार उपचार मिळवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी




महत्त्वाचा निर्णय घेतला.

**(वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)**

कर्करोग रोग उपचारासाठी सर्वसमावेशक असे धोरण निश्चित करण्यात आले आहे. नागरिकांना कर्करोग रोगासंदर्भात दर्जेदार उपचार मिळणार आहेत. यासाठी त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा निश्चित करण्यात आले आहे. राज्यभरातील १८ रुग्णालयांतून कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध होणार आहेत. यात महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन (महाकेअर फाऊंडेशन – MAHACARE Foundation) ही कंपनी स्थापन होणार असून कंपनीच्या भागभांडवलासाठी शंभर कोटींचा निधी देण्यात येणार आहे.

**(उद्योग विभाग)**

महाराष्ट्राचे जागतिक क्षमता केंद्र (ग्लोबल कॅपॅब्लिटी सेंटर - GCC) धोरण २०२५ मंजूर करण्यात आले आहे. यामुळे विकसित भारत २०४७ च्या वाटचालीस सुसंगत अशी वाटचाल व्हावी यासाठी गुंतवणूक, बहुराष्ट्रीय सहकार्य या गोष्टींना प्रोत्साहन मिळणार आहे.

**(ऊर्जा विभाग)**

औद्योगिक, वाणिज्यिक व इतर वर्गवारीतील ग्राहकांकडून वीज वापरावर अतिरिक्त वीज विक्री कर आकारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे प्रधानमंत्री कुसुम घटक-ब व अन्य योजनेंतर्गत सौर कृषीपंपासाठी वीज पुरवठा करण्याकरिता निधी उपलब्ध होणार आहे.

**(नियोजन विभाग)**

महाजिओटेक महामंडळ स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे भू-स्थानिक तंत्रज्ञान (Geospatial Technology) चा वापर करून प्रशासनात गतिमानता आणली जाणार आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून विविध क्षेत्रात धोरणात्मक नियोजन करण्यास आणि निर्णय घेण्यास मदत होणार आहे.

**(विधि व न्याय विभाग)**

सातारा जिल्ह्यात फलटण येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय होणार आहे. या न्यायालयासाठी आवश्यक पदांना व त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीस मंजूरी देण्यात आली आहे.

# लस निर्मितीसाठी हाफकिनला 25 कोटी - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : लस निर्मितीच्या क्षेत्रात हाफकिन संस्थेचं मोलाचं योगदान असून देशातून पोलिओचे उच्चाटन करण्यामध्ये हाफकिनचा मोठा वाटा आहे. भारत सरकारकडून पोलिओच्या २६८ दशलक्ष मौखिक लसींची मागणी आहे. या लसींची निर्मिती करण्यासाठी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकरातून २५ कोटी रुपयांचा निधी देण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात हाफकिन जीव औषध



निर्माण महामंडळाच्या प्रश्नांसंदर्भात आणि संस्थेतील निवृत्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर,विधान परिषद सदस्य सचिन अहिर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे सचिव धीरज कुमार, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, हाफकिनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील महिंद्रकर,विधी व न्याय विभागाच्या सहसचिव अश्विनी सैनी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सहसचिव रामचंद्र धनावडे उपस्थित होते.हाफकिन इन्स्टिट्यूट आणि हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे सक्षमीकरण करण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे. या समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी. त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि नियोजन विभागाच्या सचिवांचा समावेश करावा. या समितीने हाफकीनच्या सक्षमीकरणासाठी ५ वर्षांचा रोडमॅप तयार करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.सध्या हाफकिनकडे सर्पदंशावरील दीड लाख लस तयार आहेत. सर्पदंशावरील हाफकिनने तयार केलेली लस प्रभावी आणि परिणामकारक आहे. या लसींची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने हाफकिनमार्फत करावी, यावी असे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिले.

# खेळाडू दत्तक योजनेतील विद्यार्थ्यांना 74 लाख रुपयांच्या खर्चास स्थायी समितीची मंजुरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - पिंपरी चिंचवड महापालिकेच्या क्रीडा विभागाच्या वतीने खेळाडू दत्तक योजना राबविण्यात येते. शहरातील खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात नाव कमवावे, शहरात नवीन खेळाडू घडावेत, त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी महानगरपालिका ही योजना राबवत आहे. याच अनुषंगाने दत्तक योजना अंतर्गत २०२२-२३ मध्ये प्राप्त अर्जांची छाननी करून ४४ पात्र विद्यार्थी खेळाडूंना प्रत्यक्ष लाभ देण्यास क्रीडा विभागाच्या लेखा शिर्षातून ७४ लाख रुपयांच्या खर्चास आजच्या स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. हे खेळाडू भविष्यात नक्कीच पिंपरी चिंचवड शहराचे नाव उंचावतील असा विश्वास देखील आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केला. पिंपरी चिंचवड महापालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा



विभागनिहाय आढावाही घेतला.या बैठकीस अतिरिक्त विजयकुमार खोराटे, सह आयुक्त मनोज लोणकर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत व्हिएतनाम येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केलेले कु.प्रगती विनोद गायकवाड या खेळाडूस शिष्यवृत्ती अदा करणे, खेळाडू दत्तक योजने अंतर्गत सन २०२२-२३ मधील. पात्र विद्यार्थी खेळाडूंना २०२५-२६ ते २०२६-२७ या प्रत्यक्ष आर्थिक वर्षांमध्ये प्रत्यक्ष लाभ देणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणे, शासकीय जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ आयोजित करणे व त्यासाठी. येणाऱ्या खर्चास मान्यता देणे, घरोघरी तिरंगा २०२५ उपक्रमांतर्गत आवश्यक राष्ट्रध्वज खरेदी करणे, कर्णबधिर मुलांच्या स्पीच थेरपीद्वारे सुविधा. विभागास मुदतवाढ देणे व त्यानुसार संबंधित. संस्थेस मानधन. अदा करणे, मनपाच्या विविध पंप हाऊसचे चालन करणे (२२-२३) कामाकरिता तरतूद वर्गीकरणास महापालिका सभेच्या. अधिकारंतर्गत मा. प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणे, फ क्षेत्रीय कार्यालयच्या प्रभाग क्र. १ मध्ये पाणी पुरवठ्याचे विविध कामांतर्गत केलेले चर, खड्डे हॉट मिक्स पद्धतीने दुरुस्ती करणे, फ क्षेत्रीय कार्यालयच्या कार्य क्षेत्रातील प्रभाग क्र. ११, १२ व १३ मधील औष्णिक धुरीकरणासाठी रिक्षा टेम्पो/वाहन इंधनासह प्रतिदिन भाड्याने घेणे कामाचे द्वितीय मुदत वाढीबाबत कामाच्या खर्चास मान्यता देणे, प्रभाग १३ निगडी गावठाण येथील स्पाईन रोड परिसरातील विविध ठिकाणी रस्त्याचे हॉट मिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे, मनपाच्या १४ मेगावॅट वेस्ट टू एनर्जी मोशी प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेच्या मनपाच्या विविध आस्थापना मध्ये समायोजन करण्यासाठी एच. टी. विजग्राहक यांना ओपन एक्सेस द्वारे जोडणीचे कामाकरिता म. रा. वि. वि. कं. लि. यांस विजपर्यवेक्षण शुल्क व इतर खर्च अदा करणे, ग क्षेत्रीय कार्यालयच्या प्रभाग २१ मधील सार्वजनिक शौचालयाचे व मुतऱ्यांची यांत्रिक पद्धतीने दैनंदिन साफसफाई व देखभाल दुरुस्ती कामास मुदत वाढ देणे, प्रभाग क्र. १६ किवळे भागातील कातळे वस्ती येथील उर्वरित १८.०० मी. रुंदीपैकी ९.० मी. रुंदीचा डी. पी. रस्ता विकसित करणे, या प्रकल्पच्या कामाकरिता सल्लागार नेमणूक करणे, तसेच शिंदे वस्ती पाईपलाईन रस्ता विकसित करणे या प्रकल्पाच्या कामाकरिता सल्लागार नेमणूक करणे, ह क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील नवी दिशा योजने अंतर्गत मनपाचे सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे स्वच्छता व देखभाल दुरुस्तीचे कामकाज थेट पद्धतीने देण्यात आलेल्या कामास मुदतवाढ देणे यासह विविध.....विषयांना मान्यता देण्यात आली.

याशिवाय प्रभाग क्र. २ कुदळवाडी परिसरातील डी पी रस्ते विकसित करण्याकरिता चालू विकास कामांचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणे, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळील प्राधिकरणाकडून मनपाच्या ताब्यात आलेल्या ४९ गाळे व टॉयलेट ब्लॉक्सची दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास व नवीन उपलेखाशीर्ष तयार करण्यास मान्यता देणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस लागून असलेल्या मंजूर विकास योजनेतील भूमकर चौक वाकड येथील ताथवडे हद्दीपर्यंत १८ मी. रस्त्याने बाधित होणारे २६ सीट्स चे सुलभ शौचालय निष्कासित करण्यात मान्यता देणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# महानगरपालिकेच्या सेवेतून 22 जण सेवानिवृत्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- महानगरपालिका सेवेत वर्षानुवर्षे उत्तमरित्या सेवा करून सेवानिवृत्त होणारे आपल्या सहकारी अधिकारी,कर्मचारी यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवत आपल्या कार्याचा प्रत्यय दिला आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर यांनी केले आणि सेवानिवृत्त होणा-या अधिकारी,कर्मचा-यांना पुढील वाटचालीसाठी आरोग्यदायी शुभेच्छाही दिल्या. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत मधुकर पवळे सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात माहे सप्टेंबर २०२५



अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या १२ तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या १० अशा एकूण २२ कर्मचाऱ्यांचा सह आयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या कार्यक्रमास उप आयुक्त संदीप खोत,मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे तसेच महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. माहे सप्टेंबर २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांमध्ये स्थापत्य उप अभियंता राजेंद्र डुंबरे, असिस्टंट मेट्रन नंदिनी कदम, मध्यवर्ती औषध भांडार विभागाचे व्यवस्थापक मोहम्मद अब्दुल अब्बास, कार्यालय अधिक्षक सुभाष कुंभार, अंबर चिंचवडे, फार्मासिस्ट सुनील नाथे, उप शिक्षक शांता वायाळ, नयना रत्नपारखी, वायरलेस ऑपरेटर उषा कदम, इलेक्ट्रीक मोटार पंप ऑपरेटर लक्ष्मण लोखंडे, मुकादम कविता गोहेर, मजूर चंद्रकांत साठे यांचा समावेश आहे. तर स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये मुख्य लिपिक दत्तात्रय सातव, सफाई कामगार अलका काळे, चंदा शरद, सफाई सेवक कैलास बाराथे, दांडग्या भोसले, सफाई कामगार सुनिता भोसले, जयसिंग नढे, नंदू घुले, कचरा कुली नवनाथ जाधव, गटर कुली सुनिल जावळे यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले तर सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

# कोरियन प्रगती अभ्यासण्याची विद्यार्थ्यांना संधी - यू डोंगवान

## पीसीयू–कोस्मे शैक्षणिक सामंजस्य करार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - दक्षिण कोरियाने शैक्षणिक, तांत्रिक, औद्योगिक प्रगती केली आहे. कोस्मे - पीसीयू यांच्या मध्ये झालेल्या शैक्षणिक सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना हे ज्ञान प्राप्त करण्याची संधी मिळाली आहे. त्यासाठी पीसीयू व दक्षिण कोरिया यांच्यातील विद्यार्थी आदानप्रदान कार्यक्रमांना चालना दिली जाईल. कोरियन भाषा शिक्षण सुरू करण्यासाठी सहाय्य करून दक्षिण कोरियातील विद्यापीठांशी थेट संवाद साधण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल. पीसीयू आणि दक्षिण कोरिया शैक्षणिक व सांस्कृतिक सहकार्यासाठी पूर्ण पाठिंबा देण्यात येईल, असे प्रतिपादन दक्षिण कोरियाचे वाणिज्य दूत यू डोंगवान यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे (पीसीईटी) पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आणि दक्षिण कोरियाच्या कोरियन एसएमई (कोस्मे) यांच्या मध्ये सोमवारी (२९ सप्टेंबर) पीसीयू साते मावळ येथे सामंजस्य करार करण्यात आला. या कार्यक्रमात कोरिया फॅसिलिटेशन सेंटरचे तसेच कोस्मे ट्रेनिंग प्रोग्रामचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी कोस्मेचे चेअरमन जे क्युंग ली, पीसीईटीचे विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, माजी राज्यमंत्री व नुतन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजय (बाळा) भेगडे, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू अभ्यास मंडळ सदस्य सचिन इटकर, पीसीयूचे प्रभारी कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, प्र-उपकुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, पीसीयू उद्योग संस्था संवाद संचालक डॉ. प्रणव चारखा आदी उपस्थित होते. जे क्युंग ली म्हणाले, या सहकार्यामुळे विद्यार्थी व तरुणांना कोरियन एसएमई सोबत प्रशिक्षण व रोजगार संधी उपलब्ध होतील. तसेच कोरियन एसएमईंना महाराष्ट्रात विस्तारासाठी मार्गदर्शन, कार्यालयीन सुविधा व कायदेशीर सहाय्य, भारत व कोरिया येथील स्टार्टअप्सना विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य मिळेल. सांस्कृतिक आदान प्रदानामुळे परस्पर समन्वय वाढेल आणि दीर्घकालीन भागीदारीस चालना मिळेल. महाराष्ट्राला २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याचे सरकारचे ध्येय आहे. या करारामुळे तरुणांना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण, संशोधन आणि औद्योगिक संधी मिळणार असून हे ध्येय साध्य करण्यासाठी हा करार नक्कीच प्रेरक ठरेल. पीसीयू हे पश्चिम महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ असून कोस्मेसोबत ऐतिहासिक करार केला ही अभिमानास्पद बाब आहे. अशा आंतरराष्ट्रीय उपक्रमांमुळे पीसीयूच्या विद्यार्थ्यांना कोरियन कंपन्यांमध्ये संधी मिळतील आणि त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल, असे हर्षवर्धन पाटील म्हणाले. कोस्मेच्या जागतिक प्रशिक्षण व प्रमाणपत्र कार्यक्रमांचा लाभ पीसीयूच्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. कोरियन कंपन्यांमध्ये इंटर्नशिप, प्लेसमेंट व उच्च शिक्षणाच्या संधी, संयुक्त संशोधन उपक्रम, भविष्यकालीन क्षेत्रांमध्ये एआय, इव्ही, सेमीकंडक्टर व बायोटेक्नॉलॉजी अशा विविध क्षेत्रात संधी मिळणार आहेत, असे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले. यावेळी पीसीयू कोरिया फॅसिलिटेशन सेंटर मुख्य सल्लागार व सीईओ, स्टारजिनच्या युजिन हान यांचा विशेष गौरव करण्यात आला. त्यांनी दक्षिण कोरियाच्या नावीन्यपूर्ण उद्योग व्यवस्थेची ओळख करून देत या केंद्रामुळे भारतीय विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक वाहनं, सेमीकंडक्टर, आयटी व अत्याधुनिक उत्पादन क्षेत्रात संधी उपलब्ध होणार असल्याचे युजीन हान यांनी सांगितले. खेड, तळेगाव, चाकण परिसरात अनेक कोरियन कंपनी आहेत. हा परिसर उद्योगांचा केंद्रबिंदू झाला आहे. कोरिया फॅसिलिटेशन सेंटरच्या स्थापनेमुळे भारत-कोरिया औद्योगिक सहकार्य अधिक बळकट होईल, असे सचिन इटकरे म्हणाले. डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. सुदीप थेपडे यांनी मनोगत व्यक्त केले. या केंद्रासाठी सल्लागार मंडळाची नियुक्ती करण्यात आली असून यामध्ये - डॉ. दिनेश अमळणकर, अनिल कुमार सिन्हा, चिसुंग अन्ह, हायवॉन ली, हावॉन कु, जे जोंग ली, जे. एच. अन्ह, जोंग मान किम, नागेंद्र कौशिक, रमेश अय्यर, रौनाग पुंगालिया, सचिन सातपुते, संग जुन, सुंगवू बेंजामिन, सुन ह हा पार्क, तेसुंग किम, यंग क्यू ह्वांग, यंग पाक ली यांचा समावेश आहे.




कार्यक्रमास एस बी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या डॉ. किर्ती धारवाडकर, पीसीसीओईआरचे डॉ. हरिश तिवारी, पुणे बिझनेस स्कूलचे डॉ. गणेश राव, एनएमव्हीपीएमचे डॉ. रामचंद्र जहागीरदार, एसबीपीएसच्या डॉ. बिंदू सैनी, विविध विद्या शाखेचे अधिष्ठाता, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# रील स्टार' चित्रपटाचा संगीत प्रकाशन सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बहुचर्चित 'रील स्टार' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज आहे. १७ ऑक्टोबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. सुरुवातीपासूनच चर्चेत असलेल्या या चित्रपटातील सुमधूर गीत-संगीत प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. 'रील स्टार'च्या माध्यमातून सुमधूर संगीताची जोड देत एक आशयघन कथानक सादर करण्यात आले आहे. दादर शिवाजी पार्क जवळील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहामध्ये 'रील स्टार' चित्रपटाचा दिमाखदार संगीत प्रकाशन सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याला चित्रपटातील कलाकार, तंत्रज्ञ, निर्माते आणि संपूर्ण टिम उपस्थित होती. सारेगामा अंतर्गत संगीतप्रेमींना या चित्रपटातील गीते सादर केली जाणार आहेत.जे-फाइव्हज एंटरटेनमेंट्स, फिनिक्स ग्रुप आणि इनिशिएटिव्ह फिल्म्सच्या बॅनरखाली जोस अब्राहम, मोनिका आणि निशील कंबाती यांनी 'रील स्टार' चित्रपटाची निर्मिती केली असून निर्मलदीप प्रोडक्शनचे नासिर खान आणि गुरविंदर सिंग या चित्रपटाचे




प्रस्तुतकर्ते आहेत. 'अन्य' या हिंदी-मराठी चित्रपटानंतर दिग्दर्शक सिम्मी आणि रॉबिन यांनी 'रील स्टार'चे दिग्दर्शन केले आहे. 'रील स्टार'मध्ये भानुदास नावाच्या रस्त्यावरील एका विक्रेत्याची आणि त्याच्या कुटुंबाची कथा पाहायला मिळणार आहे. भानुदासच्या स्वप्नपूर्तीचा हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरावा असा आहे. त्याने दिलेला लढा पाहण्याजोगा आहे. नागराज मंजुळे यांचे बंधू भूषण मंजुळे या चित्रपटात मुख्य भूमिकेत असून, प्रसाद ओकने साकारलेली पत्रकाराची व्यक्तिरेखाही खूप महत्त्वाची आहे. एका रील स्टारची कथा सांगणाऱ्या या चित्रपटात वेगवेगळ्या मुड्समधील आणि वेगवेगळ्या प्रसंगांना अनुसरून एकूण पाच गाणी आहेत. 'दृश्यम' फेम संगीतकार विनू थॉमस यांनी या चित्रपटातील चार गीतांना संगीतसाज चढवला असून, 'घाव दे जरा रा...' हे गाणे संगीतकार शुभम भट यांनी संगीतबद्ध केले असून शुभम भट यांनी सुप्रसिद्ध संगीतकार ए. आर. रेहमान यांचे सहायक म्हणून काम केले आहे. 'गर गर गरा...' हे गाणे मंदार चोळकरने लिहिले असून, अभिजीत कोसंबी व सायली कांबळे यांनी गायले आहे. मंदारनेच लिहिलेले 'जगूया मनसोक्त सारे...' हे गाणे रोहित राऊतच्या आवाजात संगीत प्रेमींच्या भेटीला आले आहे. गुरू ठाकूरच्या लेखणीतून अवतरलेले 'का सुनं सुनं झालं...' हे मनीष राजगिरेच्या आवाजातील गाणे चित्रपटात एका महत्त्वाच्या टप्प्यावर येते. मंदार चोळकरने लिहिलेले 'फुलोरा...' हे गाणे मुग्धा कऱ्हाडेने गायले आहे. 'घाव दे जरा रा...' हे गाणे वैभव देशमुख यांनी लिहिले असून, संगीतकार शुभम भट यांनी आदर्श शिंदेच्या आवाजात ध्वनीमुद्रीत केले आहे. नागराज मंजुळे यांचे सहायक दिग्दर्शक सुधीर कुलकर्णी यांनी 'रील स्टार'चे लेखन केले आहे. या चित्रपटात भूषण मंजुळे, प्रसाद ओक, मिलिंद शिंदे, कैलास वाघमारे, उर्मिला जगताप, रुचिरा जाधव, स्वप्नील राजशेखर, शुभांगी लाटकर, विजय पाटकर, अनंत महादेवन, ज्ञानेश वाडेकर, महेश सुभेदार, शिवाजी पाटणे, गणेश रेवडेकर, अभिनव पाटेकर, विशाल अर्जुन, राजेश मालवणकर, प्रशांत शिंदे, करीश्मा देसले यांनी सहायक व्यक्तिरेखा साकारल्या आहेत.

# वाकड ते मामुर्डी सर्व्हिस रस्त्याच्या कामाला गती, वाहतूक कोंडीतून होणार कायमची सुटका

## आमदार शंकर जगताप यांनी पाहणी दौऱ्यात वेळेत काम पूर्ण करण्याचे दिले निर्देश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



वाकड – चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी पुन्हा एकदा भूमकर चौक ते भुजबळ चौक परिसरात ऑन ग्राऊंड पाहणी करून कामांना वेग देण्याचे आदेश दिले. त्यांच्या सततच्या पाठपुरावामुळे भागातील नागरिकांना वाहतूक कोंडीतून थोड्याफार प्रमाणावर दिलासा मिळाला आहे रस्त्याची कामे अतिक्रमणे रस्त्यावरील खड्डे बुजवणे सर्विस लाईन शिफ्ट करणे इत्यादी कामांमुळे वाहतूक सुरळीत होण्यास हातभार लागला आहे सदर परिसरातील उर्वरित ५०%उर्वरित कामांनाही फास्ट ट्रॅकवर घेण्यात येत आहे.

त्यामुळे लवकरच नागरिकांना वाहतूक कोंडीच्या त्रासातून पूर्ण दिलासा मिळणार आहे.गेल्या वर्षभरापासून वाकड-भूमकर चौक परिसरात वाढत्या वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला होता. या संदर्भात आमदार शंकर जगताप यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (N H A I), पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA), पिंपरी-चिंचवड महापालिका (PCMC), महावितरण, वाहतूक पोलीस, आरटीओ ,यांसह विविध शासकीय यंत्रणांशी सतत समन्वय साधून उपाययोजना राबवल्या.या पाठपुराव्याला आता ठोस परिणाम दिसू लागले आहेत. वीज कंपनीचे डीपी व ट्रान्सफॉर्मर शिफ्ट करणे, रस्त्यांची आखणी, खड्डे बुजविणे, अतिक्रमण हटविणे आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ताब्यातील सर्व्हिस रोडवर प्रत्यक्ष काम सुरू करणे अशा अनेक महत्त्वाच्या टप्प्यांची अंमलबजावणी झाली आहे.आजच्या स्थळ पाहणीत आमदार जगताप यांनी रस्त्यावरील झाडांची छाटणी व पुनर्रोपण, शोरूमसमोरील जागा ताब्यात घेणे, अतिक्रमण हटवणे, शिवनेरी एसटी बसस्टॉप शिफ्ट करणे, पीएमपीएमएलचे थांबे मागील बाजूस योग्य ठिकाणी हलवणे, नवीन सर्विस रस्त्याच्या कामात मध्ये टीप टॉप इंटरनॅशनल हॉटेल जवळील कंटेनर हटवणे, एमएसईबीच्या सर्विस लाईन शिफ्ट करणे, ड्रेनेज लाईन स्थलांतरित करून जोडणे , वाहन चालकांकरता नवीन कॅरेज वे तयार करणे,यासारख्या तातडीच्या सूचनादेखील दिल्या.याशिवाय त्यांनी भुजबळ चौकात हिंजवडीकडे वळताना फ्री लेफ्ट देणे, हॉटेल सोनम जवळील अतिक्रमण काढणे, ४५ मीटर रस्त्याचा ताबा घेणे, चौकातील आयलंड कमी करणे, पीएमपीएमएल बस स्टॅन्ड मागे घेणे, महावितरणचा डीपी शिफ्ट करून केबल डक्टमध्ये टाकणे, रांजाई हॉटेलजवळील होर्डिंग काढणे, संयुक्त पाहणी करून डांबरीकरण करणे अशा महत्त्वाच्या सूचना केल्या. तसेच महामार्ग प्राधिकरणाने वाहतूक विभागाला काँक्रीट बॅरिकेड्स द्यावेत, खड्डयांमध्ये ब्लॉक बसवावेत, दोन बारा मीटर कॅरेज वे शनिवारपर्यंत क्लिअर करावेत, नगररचना विभागाने टप्प्याटप्प्याने जागा ताब्यात घ्यावी आणि संयुक्त अतिक्रमण कारवाई करावी, असे निर्देश दिले.भुजबळ चौकातील ट्रान्सफॉर्मर मागे घेतल्यानंतर तातडीने रस्ता तयार करण्याचे आदेशही त्यांनी दिले. टू-व्हीलर वाहनचालक चुकीच्या बाजूने रस्ता ओलांडू नयेत यासाठी प्रतिबंधक उपाय करण्यास सांगितले. शिवनेरी बस रस्त्यावर उभी न करता आत थांबवणे, बस थांबा मागे शिफ्ट करणे, दुसऱ्या बाजूस हलवणे, पीएमपीएमएल बस स्टॅन्डवरच बस थांबवणे, महामार्ग प्राधिकरणाकडून पुशबॅकसाठी पत्र घेणे,टीप टॉप इंटरनॅशनल हॉटेलकडील लेफ्ट फ्रीसाठी झाडे काढून पुनर्रोपण करणे, कंटेनर हटवणे, वृक्ष प्राधिकरणाची परवानगी घेऊन आठ-दहा दिवसांत योग्य ती कारवाई करावी, माने वस्ती एमजी शोरूमसमोरील वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या गाड्या क्रेन लावून उचलणे, मारुती सुझुकी शोरूमजवळील बॉटलनेक दूर करणे, झाडे-झुडपे हटवणे, महानगरपालिकेच्या डक्ट मधील मधील वीज कंपनीच्या केबल सोडून इतर केबल काढून टाकणे, वाहतूक विभागाच्या समन्वयाने अतिक्रमण दूर करणे वआठवडे बाजारास परवानगी न देणे, इत्यादी सूचना आमदार जगताप यांनी दिल्या.या पाहणीत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त वाहतूक विवेक पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता गट्टूवार साहेब,बीआरटीचे प्रमुख अभियंता बापू गायकवाड, महावितरण चे कार्यकारी अभियंता श्रीयुत मुंडे, राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता घंटे ,सहाय्यक अभियंता मोरे, महावितरणचे कार्यकारी अभियंता मुंडे, वाहतूक पोलीस निरीक्षक श्री सोनवणे, एपीआय थोरात, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रीय अधिकारीअमित पंडित , एन एच आय जे कन्सल्टंट सुधीर आथळकर , डी एम आर कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर राकेश चव्हाण , मनपाचे विभागाचे कार्यकारी अभियंता विनय ओव्हाळ, स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील शिंदे, बीआरटी विभागाचे सुनील पवार, आरोग्य विभागाचे शांताराम माने व इतर अधिकारी उपस्थित होते.आमदार जगताप यांनी स्पष्ट केले की, “सध्या ५०% दिलासा नागरिकांना मिळत आहे. येत्या पंधरा-वीस दिवसांत उर्वरित कामे पूर्ण होऊन शंभर टक्के वाहतूक कोंडीतून मुक्तता मिळेल.”आमदार शंकर जगताप यांच्या सततच्या पाठपुरावा आणि प्रत्यक्ष कृतीमुळे भूमकर चौकातील कामे आता फास्ट ट्रॅकवर आली आहेत. लवकरच नागरिकांना सहज व सुरळीत प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

# गुन्हेगारांना अभय आणि देशाच्या सेवकांना तुरुंग? - प्रशांत जगताप

## निलेश घायवळचे लंडनला पलायन, सोनम वांगचुक यांना तुरुंगवास : राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : एकीकडे महाराष्ट्राचे गृहमंत्री खंडणी, दरोडा, अपहरण, खून, गोळीबार असे गंभीर गुन्हे करणाऱ्या निलेश घायवळ सारख्या गुन्हेगारांना लंडनला पळवून लावण्यासाठी कार्यरत आहेत, तर दुसरीकडे देशाचे गृहमंत्री सत्तेच्या बळावर सोनम वांगचुक यांच्यासारख्या समर्पित देशभक्त व मॅगसेसे पुरस्काराने देशाचे नाव उज्वल करणाऱ्या व्यक्तिमत्त्वास राष्ट्रीय सुरक्षा कायद्यासारख्या कठोर कायद्यांतर्गत तुरुंगात डांबत आहेत. या अराजकतेच्या विरोधात शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.सोनम वांगचुक हे देशाच्या सीमेवरील लडाख येथे अतिशय प्रतिकूल परिस्थितीत गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम करतात. आपल्या या कार्यातून मॅगसेसे पुरस्कारासह अनेक आंतरराष्ट्रीय सन्मान मिळवून त्यांनी भारत देशाचे नाव उज्वल केले आहे. आपल्या ज्ञानाने बर्फाळ प्रदेशातील सैनिकांना उपयोगी ठरतील असे अत्याधुनिक पद्धतीचे तंबू तयार करून त्यांनी भारतीय सैन्याची फार मोठी मदत केली आहे. संशोधन क्षेत्रातील त्यांचे कार्य संपूर्ण विश्वात नावाजले गेले आहे. असे असताना गेल्या काही काळापासून त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या देशद्रोही कृत्यांची पोलखोल करण्यास सुरुवात केली. लडाखची हजारो एकर जमीन चीनने गिळंकृत केल्याची बाब त्यांनी समोर आणली. याचा राग म्हणून मोदी सरकारने त्यांना जोधपुर येथे तुरुंगात डांबले आहे. दुसरीकडे पुण्यातील अट्टल गुन्हेगार निलेश घायवळ हा बनावट पत्ता व बनावट पासपोर्ट तयार करून लंडनला पळून गेला आहे. पुण्यातील अनेकांचे आयुष्य उध्वस्त करून हा गुन्हेगार सरकारच्या मदतीमुळेच लंडनला सुरक्षितपणे निघून गेला. बनावट पत्त्यावर पासपोर्ट तयार करणे, लंडन सारख्या ठिकाणी व्हिसा मिळणे या बाबी सरकारी मदतीशिवाय अशक्य आहेत. महाराष्ट्राचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या गोष्टीची चौकशी करावी व नेहमीप्रमाणे कोणालाही अभय न देता गुन्हेगारांना कडक शासन करावे, मोदी सरकारने सोनम वांगचुक यांची तुरुंगातून सुटका करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली.देशात व महाराष्ट्रात सुरू असलेली ही अराजकता भारतासारख्या महान लोकशाही देशासाठी अत्यंत दुर्दैवी आहे. या अराजकतेचा निषेध व्यक्त करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. बालगंधर्व रंगमंदिर चौक येथे माझ्यासह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा निषेध व्यक्त केला.

वाढत्या गुन्हेगारीमुळे जनता भयभीत असताना देवेंद्र फडणवीस गुन्हेगारांना अभय देत आहेत, त्यांनी ताबडतोब राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यात आली.बालगंधर्व रंगमंदिर चौक येथे करण्यात आलेल्या या आंदोलनात प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात उदय महाले, अनिता पवार,रमीझ सय्यद, किशोर कांबळे, हेमंत बधे, शैलेंद्र बेल्हेकर, प्रसाद कोद्रे, पप्पू घोलप, आसिफ शेख, डॉ.शशिकांत कदम, युसूफ शेख, रुपाली शेलार, नरेंश पगडालु, गणेश नलावडे आणी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579